जनसंपर्क कक्ष
29 OCT 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रिलायन्सच्या संशोधकांची विद्यापीठास भेट

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनाचे औद्योगिक उपयोजन झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने या देशात विकास प्रवर्तनास सुरूवात होईल,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपच्या संशोधन आणि विकास केंद्राच्या शास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथे उपलब्ध असलेल्या संशोधकीय सुविधांची पाहणी केली. या संशोधक टीमशी संवाद साधताना डॉ. शिर्के बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच विज्ञान शाखांमध्ये आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन सुरू आहे. या संशोधन कार्याला यूजीसी, डीएई यांसारख्या देशातल्या वित्तीय संस्थांकडून आर्थिक पाठबळ लाभले आहे. तथापि, या संशोधनाचा खऱ्या अर्थाने समाजाला लाभ होण्यासाठी विद्यापीठे, वित्तीय संस्था यांच्या बरोबरीने उद्योग क्षेत्र असा त्रिकोण विकसित होण्याची गरज आहे. रिलायन्स उद्योग समूहाचे संशोधन व विकास केंद्र ज्या प्रकल्पांवर काम करीत आहे, त्यातील बहुतेक क्षेत्रांमध्ये विद्यापीठात संशोधन कार्य सुरू आहे. त्यामुळे भविष्यात विद्यापीठ आणि रिलायन्स उद्योग समूह यांच्यातील संशोधन साहचर्य अधिकाधिक विकसित होत जाण्याच्या दृष्टीने या टीमची आजची भेट अत्यंत महत्त्वाची ठरेल.'



**शिवाजी विद्यापीठास 'रिलायन्स'च्या संशोधक टीमने भेट दिली. या प्रसंगी झालेल्या बैठकीत बोलताना रिलायन्सच्या टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांनी रिलायन्स उद्योग समूहाबरोबरच तेथील संशोधन व विकास केंद्राच्या वाटचालीविषयी सादरीकरण केले. ते म्हणाले, 'सर्वसामान्य व्यक्ती डोळ्यांसमोर ठेवून रिलायन्स उद्योग समूहामध्ये संशोधनाचे कार्य चालते. त्यामुळे समूह पेट्रोकेमिकल्स, वस्त्रोद्योग, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांत जागतिक स्तरावर अग्रगण्य कामगिरी बजावत आहे.'

यावेळी समूहाचे उपाध्यक्ष डॉ. नटराजन् वेंकटेश्वरन, उपाध्यक्ष सुरेश अय्यंगार, संशोधक डॉ. प्रथमेश साळवी, ऑपरेशन्स मॅनेजर रंजना काठवटे यांबरोबर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता पी.एस. पाटील, प्रा. ए.एम. गुरव, जी.एस. गोकावी, व्ही.जे. फुलारी, ए.व्ही. घुले, ज्योती जाधव, आदी उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. प्रा. एस.एस. कोळेकर यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. एस.बी. सादळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2017
सकाळ

# संशोधनाचे उपयोजन आवश्यक : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. २८ : 'शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनाचे औद्योगिक उपयोजन झाल्यानंतर देशाच्या विकासास गती मिळेल,' असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपच्या संशोधन व विकास केंद्राच्या शास्त्रज्ञांनी आज शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथे उपलब्ध असलेल्या संशोधकीय सुविधांची पाहणी केली. या संशोधक टीमशी संवाद साधताना डॉ. शिर्के बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यापीठाच्या सर्वच विज्ञान शाखांत आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन सुरू आहे. संशोधन कार्याला यूजीसी, डीएई यांसारख्या देशातल्या वित्तीय संस्थांकडून आर्थिक पाठबळ मिळाले आहे. मात्र, संशोधनाचा खऱ्या अर्थाने समाजाला फायदा होण्यासाठी विद्यापीठे, वित्तीय संस्था यांच्याबरोबरीने उद्योग क्षेत्र असा त्रिकोण विकसित होण्याची गरज आहे. रिलायन्स उद्योग समूहाचे संशोधन व विकास केंद्र ज्या प्रकल्पांवर काम करत आहे, त्यांतील बहुतेक क्षेत्रांत विद्यापीठात संशोधन सुरू आहे."

यावेळी रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांनी रिलायन्स उद्योग समूहाबरोबरच तेथील संशोधन व विकास केंद्राच्या वाटचालीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, "सर्वसामान्य व्यक्ती डोळ्यांसमोर ठेवून रिलायन्स उद्योग समूहात संशोधन सुरू आहे. समूह आज पेट्रोकेमिकल्स, वस्त्रोद्योग, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांत जागतिक स्तरावर अग्रगण्य कामगिरी करत आहे." या वेळी समूहाचे उपाध्यक्ष डॉ. नटराजन् वेंकटेश्वरन, उपाध्यक्ष सुरेश अय्यंगार, संशोधक डॉ. प्रथमेश साळवी, ऑपरेशन्स मॅनेजर रंजना काठवटे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले उपस्थित होते.

पुढारी

# रिलायन्सच्या संशोधकांची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनाचे औद्योगिक उपयोजन झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने या देशात विकास प्रवर्तनास सुरुवात होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे केले.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपच्या संशोधन व विकास केंद्राच्या शास्त्रज्ञांनी आज शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथे उपलब्ध असलेल्या संशोधकीय सुविधांची पाहणी केली. या संशोधक टीमशी संवाद साधताना डॉ. शिर्के बोलत होते. यावेळी रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच विज्ञान शाखांत आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन सुरू आहे. या संशोधन कार्याला यूजीसी, डीएई यासारख्या देशातल्या प्रथितयश वित्तीय संस्थांकडून आर्थिक पाठबळ लाभले आहे.

यावेळी समूहाचे उपाध्यक्ष डॉ. नटराजन वेंकटेश्वरन, सुरेश अय्यंगार, संशोधक डॉ. प्रथमेश साळवी, ऑपरेशन्स मॅनेजर रंजना काठवटे यांच्याबरोबर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता प्रा. पी.एस. पाटील, प्रा. ए.एम. गुरव, प्रा. जी.एस. गोकावी, प्रा. व्ही.जे. फुलारी, प्रा. ए.व्ही. घुले, प्रा. ज्योती जाधव, प्रा. जी.बी. कोळेकर, प्रा. पी.व्ही. अनभुले, डॉ. डी.एस. भांगे, डॉ. जे.बी. यादव, डॉ. एन.एस. देशपांडे, डॉ. एस.बी. सादळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2017
Times of India

# SUK registrar visits area for sericulture

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) registrar Vilas Nandavadekar visited Yalgud and surrounding areas, which are gaining ground for sericulture farming.

The visit was organised in the wake of two sericulture courses introduced by the university earlier last month.

Registrar Vilas Nandavadekar during his visit said that sericulture farming has proved to be a boon for many families in the area. He promised that the university will always be there to encourage and resolve queries from farmers.

A D Jadhav, faculty member from the university's zoology department said that such interactions with farmers ensure that the latter are not exploited.

He said that over 150 farmers from Yalgud area are dependent on sericulture farming. In a month's harvest the farmers can earn somewhere between Rs 20,000 and Rs 3 lakh. In a year 6-7 such harvests can take place.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2017
पुढारी

# रेशीम शेती प्रकल्पास कुलसचिवांची भेट

**कोल्हापूर :** यळगूड परिसरातील रेशीम शेती प्रकल्पास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह प्राध्यापकांनी भेट देऊन पाहणी केली. प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांच्यासह रेशीम शेती करणारे शेतकरी आप्पासो झुंजार, विश्वास खोत, राजेंद्र बागल, महावीर वसवाडे, जगताप आदी यावेळी उपस्थित होते.